महापालिका महाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-येवलेवाडी, पुणे महानगरपालिका.
कार्यालयाचा पत्ता- जे.एस.पी.एम.बिल्डींग,
सावंत कॉर्नर, कात्रज, पुणे-४११०४६
कार्यालयाचा संपर्क क्र. :- ०२०-२५५०८८००
ई-मेल:- kondhwa@punecorporation.org
विस्तारित क्र.:- ०२०-२५५०८८००
जावक क्र. :- ५०५१ दिनांक:- २३/०९/२५

माहिती अधिकार

## अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त, कोंढवा-येवलेवाडी
## पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय

**१. अपिलार्थी**
श्री. शिरीष ज्ञानेश्वर सपकाळ
कोहिनूर सोसायटी सर्व्हे नं. ४८
गोकुळनगर गल्ली नं. ०३ ध्रुव रेसिडेन्सी शेजारी,
सरस्वती कुंज,फ्लॅट नं. १०१,१०२
कात्रज कोंढवा रोड, कोंढवा
पुणे-४११०४८
मो.नं.-९१५६९३९८४८

**२. श्री.गणेश तारू**
जन माहिती अधिकारी तथा क्षेत्रिय अतिक्रमण निरीक्षक
कोंढवा- येवलेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.

**अपिलार्थी श्री. शिरीष ज्ञानेश्वर सपकाळ**
**विरुद्ध**
**जन माहिती अधिकारी तथा क्षेत्रिय अतिक्रमण निरीक्षक, पुणे महानगरपालिका.**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल**

माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अपिलार्थी श्री. शिरीष ज्ञानेश्वर सपकाळ यांनी दि. ०८/०८/२०२५ रोजी क्षेत्रिय अतिक्रमण निरीक्षक तथा जन माहिती अधिकारी महापालिका सहाय्यक आयुक्त कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालय यांचेकडे अर्ज करून माहितीची मागणी केलेली आहे.

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकाऱ्याने उपलब्ध करून दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहार संबधीची माहिती.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारांतर्गत अर्ज सादर केल्याचा आवक क्र.व दिनांक | माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक | अर्जदारास उत्तर पाठविल्याचा जावक क्र. व दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| आ.क्र. ५१८१ दि. ०८.०८.२०२५ | ०८.०९.२०२५ | जा.क्र. ४४६२ - दि.२६.०८.२०२५ | - | दि.२६.०८.२०२५ |

प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण :- श्री. शिरीष ज्ञानेश्वर सपकाळ यांनी अपिल अर्जात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे.

१) अपिलाचे मुद्दे:- अर्जामध्ये ज्या कर्मचारी व अधिकाऱ्यांनी दिलेल्या सोसायटीचे दिनांक. ०५/०८/२०२४ चे अर्जावर ६ महिन्यांपेक्षा जास्त कालावाधीत कोणतीही कारवाई न करता प्रलंबित ठेवलेले त्या बाबत दि.१७/०१/२०२५ रोजी दिलेल्या तक्रार अर्जानुसार केलेल्या कारवाईबाबत माहिती न देता आपलेकडील पत्र क्र. ४४६२ दि. २६/०८/२०२५ अन्वये श्री. गणेश तारू जनमाहिती अधिकारी तथा क्षेत्रीय अतिक्रमण निरीक्षक परिमंडळ ०४ पुणे महानगर पालिका यांनी चुकीचे उत्तर देऊन आवश्यक कागदपत्रांच्या नकला न दिले बाबत

२) माहितीचा तपशील : माहिती अधिकार अधिनियम २००५ अर्जात नमूद मुद्दा क्र. ४ चे अनुषंगाने माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये श्री. गणेश तारू जनमाहिती अधिकारी तथा क्षेत्रीय अतिक्रमण निरीक्षक परिमंडळ ०४. पुणे यांनी आवश्यक ती माहिती न देता त्यांच्याकडील पत्र क्र. ४४६२ दि. २६/०८/२०२५ अन्वये चुकीचे उत्तर देऊन माहिती अधिकार अर्ज चुकीच्या पद्धतीने निकाली काढण्यात आलेला आहे.

३) आवश्यक असलेल्या माहितीचे स्वरुप व तपशील:- कोहिनूर सोसायटी, तर्फे श्री. शिरीष ज्ञानेश्वर सपकाळ व इतर १२ सभासद रा. सर्व्हे नं. ४८ गोकुळनगर गल्ली नं. ३ ध्रुव रेसिडेंन्सी शेजारी कात्रज कोंढवा रोड, कोंढवा पुणे ४११०४८ यांनी दिलेल्या दि.०५/०८/२०२४ रोजी सार्वजनिक रस्त्यावर अतिक्रमणाबाबत दिलेल्या तक्रार अर्जावर दि.१७/०१/२०२५ अखेर कोणतीही कार्यवाही न केलेमुळे त्याचेवर दि. १७/०१/२०२५ रोजी तक्रार अर्ज देऊन दफ्तर दिरंगाई अधिनियम २००५ चे कलम १० (१,२,३) नुसार केलेल्या कार्यवाही बाबत माहिती मिळणेबाबत.

| प्रथम अपिल अर्जाचा तपशिल | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का? | प्रथम अपिल सुनावणी सूचना पाठविल्याचा जावक क्र. व दिनांक |
| १५.०९.२०२५ | आ.क्र. ६०८०<br>दि.०९.०९.२०२५ | होय | - | जा.क्र. ४७८९<br>दि.१०.०९.२०२५ |

**प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ:- २३.०९.२०२५ रोजी सकाळी १०.१५ वाजता**
**सुनावणीस अपिलकर्ता :- अनुपस्थित**
**सुनावणीस जन माहिती अधिकारी :- उपस्थित**

## विवेचन

माहिती अधिकार अर्जावरील सुनावणी मध्ये अपिलार्थी अनुपस्थित होते तसेच श्री. गणेश तारू जनमाहिती अधिकारी तथा क्षेत्रिय अतिक्रमण निरीक्षक (अतिक्रमण विभाग) उपस्थित होते. दरम्यान जन माहिती अधिकारी तथा क्षेत्रीय अतिक्रमण निरीक्षक यांना विचारणा केली असता सदर बाब ही शहर अभियंता बांधकाम विकास विभाग यांचेशी संबंधित असल्याचे नमूद केले.

## आदेश

अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अर्जात नमूद केलेली माहिती, विवेचन मध्ये नमूद केल्याप्रमाणे अपील सुनावणी दरम्यान झालेल्या चर्चेनुसार सदर बाब ही शहर अभियंता बांधकाम विकास विभाग यांचेशी संबंधित आहे.

सबब सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे

(सुचिता पानसरे)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
महा.सहा.आयुक्त
कोंढवा येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका

दिनांक:- २३.०९.२०२५
ठिकाण:-पुणे

टीप:- सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९ (३) अन्वये निर्णय प्राप्त झाल्यापासून ९० दिवसांच्या आत मा. आयुक्त राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय इमारत, विधानभवन समोर पुणे-४११००१ यांचेकडे द्वितीय अपिल करता येईल.